पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 46/2026
प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २०/०७/२०२६ |
|---|---|

# ''घरफोडी चोरी करणारे ०४ सराईत गुन्हेगारांना अटक करुन नवी मुंबई गुन्हे शाखाने केले ०८ गुन्हे उघड''

श्री.मिलींद भांरबे, पोलीस आयुक्त, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरातील घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश व मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.

वाशी पोलीस ठाणे, नवी मुंबई, गु.र.नं. ३२३/२०२६, भान्यासं कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ अन्वये दाखल असुन मा.वरिष्ठांच्या आदेशान्वये गुन्हे शाखा, कक्ष– ०१ कडुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करण्यात येत होता. गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान कक्ष– ०१ गुन्हे शाखेकडील तपास पथकाने घटनास्थळ व नवी मुंबई परिसरातील सी.सी.टी.व्ही. कमेऱ्यांची पाहणी करून आरोपींचे फोटो डेव्हलप केले. नमुद फोटोमधील आरोपी घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. सदरचे आरोपी हे दिनांक १८/०७/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील मुद्देमालाची विल्हेवाट लावण्यासाठी एका रिक्षाने तुर्भे रेल्वे स्टेशन परिसर, ठाणे बेलापुर मार्गावर येणार असल्याची खात्रीशिर माहिती सपोनि निलेश बनकर यांना प्राप्त झाली. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष – ०१, वाशी, नवी मुंबई कडील पथकाने तुर्भे रेल्वे स्टेशन परिसरामध्ये सापळा रचुन ०४ आरोपींना रिक्षासह ताब्यात घेतले. आरोपी नामे **(१)मो. आफताब सरफराज खान उर्फ राजू,** वय ३४ वर्षे, व्यवसाय– रिक्षा ड्रायव्हर, रा.संत रोहिदास उद्यान, म्युनिसिपल कॉलनी, सेक्टर २, गोवंडी पूर्व, मुंबई. **(२)शब्बीर जमील अहमद कुरेशी उर्फ तोतला,** वय ३२ वर्षे, व्यवसाय– नोकरी, राह जाकीर नगर, कुत्ता कंपाऊंड, देवनार, गोवंडी पूर्व, मुंबई. **(३)मो.गणी नेक मोहम्मद,** वय– ३८ वर्षे, व्यवसाय– भंगार दुकानात नोकरी, रा. धरनगाव, धानसर टोल नाका जवळ, तळोजा, नवी मुंबई. **(४)रमजान अली मकदुम शेख,** वय – ३९ वर्षे, व्यवसाय– रिक्षा ड्रायव्हर, रा. लाला कंपाऊंड, विक्रोळी, बम्बखाना, विक्रोळी, मुंबई यांचेकडे तपास करता त्यांनी वाशी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ३२३/२०२६, भान्यासं कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ हा गुन्हा केल्याची कबुली देवुन त्याचेकडे असलेला एम.आय. कंपनीचा ५०५२ इंचाचा स्मार्ट टिव्ही व लेनोवो कंपनीचा लॅपटॉप हा सदर गुन्हयातील असल्याचे सांगितले. आरोपींना सदर गुन्हयात अटक केली असुन त्यांची दिनांक २१/०७/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. गुन्हयाचा पुढील तपास वाशी पोलीस ठाणे करीत आहे. नमुद आरोपींकडे कौशल्यपुर्ण व सखोल तपास करता त्यांनी खालील गुन्हे केल्याची निष्पन्न झाले आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे,**

| अक्र | पोलीस ठाणे व गुन्हा रजिस्टर नंबर | सहभाग |
|---|---|---|
| १) | वाशी पो ठाणे, गु.र.नं. ३२३/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ | मुद्देमाल (टिव्ही आणि लॅपटॉप हस्तगत) ५०,०००/– रू.किं.ची |
| २) | वाशी पो ठाणे, गु.र.नं. ६९८/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५. | प्राप्त फिंरगप्रिन्ट वरुन. |
| ३) | वाशी पो ठाणे, गु.र.नं. ४४५/२०२५, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५. | प्राप्त सीसीटीव्ही फुटेज वरुन निष्पन्न. |
| ४) | वाशी पो.ठाणे, गु.र.नं. २१५/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५. | प्राप्त सीसीटीव्ही फुटेज वरुन निष्पन्न. |

| | | |
|---|---|---|
| ५) | नेरुळ पो.ठाणे, गु.र.नं. ४७३/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ | प्राप्त सीसीटीव्ही फुटेज वरुन निष्पन्न. |
| ६) | मानपाडा पो ठाणे, गु.र.क्र. ५९६/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ | प्राप्त सीसीटीव्ही फुटेज वरुन निष्पन्न. |
| ७) | आरऐके मार्ग पो.ठाणे, ७७/२०२६, बीएनएस कलम ३३१(३), ३३१(४), ३०५. | प्राप्त सीसीटीव्ही फुटेज वरुन निष्पन्न. |
| ८) | निर्मल नगर पो ठाणे, मुंबई गु.र.क्र. ५४६/२०२६, बीएनएस कलम ३०३(२). | मुद्देमाल ३०,०००/— रू. किं.ची (रिक्षा हस्तगत) |

वर नमुद आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन वरील गुन्हयांमध्ये एक रिक्षा, टिव्ही व लॅपटॉप असा एकुण ८०,०००/— रू.किं.ची मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी श्रीमती प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाने गुन्हे शाखा, कक्ष— ०१ वाशीचे वपोनि/विकास घोडके, सपोनि/निलेश बनकर, पोउपनि/अभय काकड, श्रेणी पोउपनि/उदय म्हात्रे, पोहवा/२०४९ दिपक मोरे, पोना/अझहर मिर्झा, पोशि/३०७६ सचिन पाटील व पोशि/३८४३ विशाल सावरकर यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★